सोबत

२०२०-२१

सोबत फाऊंडेशन चंद्रपुर संलग्नीत

जाणीव रुग्णालय, गेवरा बुज

ता. सावली जि. चंद्रपुर

सोबत

२०२०-२१

विज्ञान युगात
मानवि जीवनास आवश्यक
गरजांपासून कोसो दुर
असणाऱ्या ग्रामीण व
आदिम लोकजीवनास

समर्पित

* कार्यालय पत्ता : सोबत फाऊडेशन,
जाणीव रुग्णालय, मु. रामनगर, पो. गेवरा बुज,
मुडझा रोड, ता. सावली, जि. चंद्रपूर – ४४१२१५
* ई-मेल : sobatchandrapur20@gmail.com
* मो. : ७८२३८३६७०७

* वर्ष पहिले

* मुद्रक : वैनगंगा डिजीटल, गडचिरोली

* सहयोग निधी –
रु. ५०/– फक्त

अंतरंग

सोबत

२०२०-२१

- सोबत : १
- माझा सोबत पर्यंतचा प्रवास : ०५
- लोकाधार : ९
- जाणीव रुग्णालय गेवरा बुज : ११
- गेवरा परिसरातील प्रसुतीची समस्या : १४
- पडलेला प्रश्न : १६
- यशोगाथा-१ : १७
- यशोगाथा-२ : १८
- कोविड केअर सेंटर : १९
- खाज-एक सार्वजनिक समस्या : २१
- अनुभव : २२
- माझा प्रवास : २४
- जाणीव रुग्णालय गेवरा बुज : २८
- सोबत एक प्रवास : ३०

सोबत

२०२०-२१

आभार...

* रोजच्या प्रवासात भेटणारे सर्व जनमान्य व रुग्ण
* समस्त ग्रामजन गेवरा परिसर
* निर्माण व मित्र परिवार, चातगांव, गडचिरोली (म.रा.)
* अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ
* सेवांकुर (म.रा.)
* शोधग्राम परिवार, चातगांव, गडचिरोली (म.रा.)
* शहिद रुग्णालय व परिवार, दल्लीराजहरा (छ.ग.)
* कस्तुरबा हेल्थ सोसायटी व रुग्णालय, सेवाग्राम (म.रा.)
* इंदिरा गांधी शासकिय वैद्यकीय महाविद्याल, नागपूर (म.रा.)
* आता पर्यंतच्या प्रवासातील सर्व शिक्षक वृंद

सोबत

माणूस म्हणून जगताना आपण एकट जगू शकतो का? तर याच सोप उत्तर नाही हे आहे. जगतांना आई वडील, नातेवाईक, परिसर , परिसरातील प्राणी, जीवसृष्टी असे सगळे येतात. आपल्या सारखेच इतरही यात असतात आणि या सर्वांचा मिळून आपला समाज होतो . आपण एकट जगू म्हंटल तरीसुद्धा आपण एकट जगत नसतो कारण आपण या ना त्या कारणासाठी विविध लोकांवर, कुटुंबांवर, व सभोवतालच्या जीवसृष्टीवर अवलंबून असतो .

तशा या माणसाचा, माणूस राहतो त्या कुटुंबाचा, आणि कुटुंब राहतात त्या समाजाचा व मानवी समाज ज्या प्राणी व पर्यावरना सोबत राहतो त्या जीवसृष्टीचा इतिहास हा फार जुना आहे .

जीवसृष्टीच्या जन्मापासून ते आतापावतोचा हा प्रवास वैविध्यपूर्ण आहे. आदिम जंगलात राहणारा, शिकार करुन पोट भरणारा माणूस पासून वसाहत करून व्यवसाय करून राजे रजवाड्यांच्या व्यवस्थेत राहणारा माणूस ते लोकशाही च्या सध्याच्या जनमान्य आधारावर जागतिक जगात जगणारा माणूस हा इथपर्यंतचा प्रवास आहे . हा प्रवास विविध संघर्ष, लढाया, शोध, खून, स्वतंत्रता संग्राम, अन्याय, अत्याचार निवाडे यांनी भरलेला आहे त्याच बरोबर साहित्य, कला, खेळ, वैज्ञानिक शोध, अध्यात्म अशा विविध सौंदर्याने नटलेला आहे .

जीवसृष्टी आणि मानवजीव याच्या ह्या प्रवासात येथील आतापावतोच्या सर्वच सजीव सृष्टीचे अनन्य असे योगदान आहे. ज्यामुळे आपण आताच्या घटकेला उभे आहोत .

जेव्हा आपण प्रवास म्हणतो तेव्हा आपण कुठून तरी कुठपर्यंत जात असतो. तेव्हा आपण संपूर्ण सजीवसृष्टी कुठ जातोय. जग पुढ जातंय अस आपण सर्वच नेहमी म्हणत असतो. याचाच अर्थ आपण, आपल्यातील सर्वजन या मानवजीव आणि सजीव सृष्टी च्या प्रगतीसाठी, संवर्धनासाठी, सुखासाठी कार्यरत आहोत.

पण म्हणजेच, आताच्या घटकेला जेव्हा आपण अवती भोवती पाहतो तेव्हा सर्व आलबेल म्हणजेच व्यवस्थित आहे का? सर्व काही ठीक चाललय अस आपल्याला वाटते का? काय उत्तर द्याल नाही. नाही हेच उत्तर आपण सर्वे देऊत. इतके निश्चित .

माणूस म्हणून आपण जेव्हा ह्या जीवसृष्टीत जन्म घेतो, तेव्हा आपण कोण कुठल्या

देशात, कुठल्या राज्यात, कुठल्या प्रदेशात, कुठल्या समाजात, कुठल्या कुटुंबात, कुणाच्या पोटी जन्माला यावे हे आपल्या हाती नाही.

ह्यातल्या प्रत्येक घटकाला अनेक वर्षांचा इतिहास आहे, हा मानवी इतिहास त्याने केलेल्या कृतीचा आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या जन्मापासून त्याच्या वाट्याला येणाऱ्या चांगल्या वाईट गोष्टी घटकानुसार ठरतात न कि नाशिबानुसार.

आपण इथपावतो आलो म्हणजे झाले का ? हा अविरत चालणारा प्रवास आहे . इथून पुढील प्रवास कसा असेल . इथून पुढील प्रवास हा देखील तसाच आहे... आपल्या सर्वांच्या कृतीचा, वैयक्तिक कृतीचा, कौटुंबिक कृतीचा, सामुहिक कृतीचा, तसेच राज्य व देश स्तरावरील कृतीचा. आणि त्या सोबतच मानव म्हणून जागतिक स्तरावरील एकत्रित कृतीचा. आपण बहुदा नशीब म्हणून दोष देत राहतो कि माझ्या आयुष्यात, आमच्या कुटुंबात, आमच्या परिसारत आणि आमच्या देशात असच आहे, हेच नाही तेच नाही. आपल नशीब खराब आहे. मात्र याला जवाबदार आपणच ना ? आपली कृती .... बरोबर ना ?

जस आपली आताची परिस्थिती हि आपल्या पूर्वजांच्या कर्तुत्वाचा इतिहास आहे, त्यांच्या चांगल्या वाईट कृतीची फळे आहेत तसच आपली आताची कृती पुढील काल ठरवणार आहे . त्यामुळे आपण आपल्या आताच्या जगण्याने आपण स्वतः ला व समाजाला समृद्ध करत पुढील काळासाठी सुंदर मार्ग तयार करणे आवश्यक आहे .

आणि म्हणूनच ह्या प्रवासातली हि ....सोबत

तेव्हा हि सोबत कुणाची....... ? ?

माझी......, माझ्या कुटुंबाची...., माझ्या समाजाची...., माझ्या तुमच्या सारख्या प्रत्येकाची .... जसे आपण सारे सोबत का ? हे समजून घेतले तसेच आपण सारे सोबती कोण ? हे सुद्धा जाणले आहे .

ह्या प्रवासातली आपली हि सोबत आपली जवाबदारी आहे, आपले कर्तव्य आहे ... पुढील काळाच्या हिताचे ध्येय ठेऊन माझी तुमची माझ्यासाठी तुमच्यासाठी आमच्यासाठी आपल्या सर्वांसाठी चालविलेली चळवळ आहे . एक बांधून नसली तरी सामुहिक कृती आहे.

ह्यात आपण सारे सहभागी होऊ शकतो. यात सोबतीला प्रत्येकाची सोबत आवश्यक आहे आणि सर्वेच यात साथ देऊ शकतात. आपण कस काय करु शकतो ? हा प्रश्न पडेल, मिळून कृती करायची म्हंटली तर आम्ही तर रोज येऊन सोबत काम करू शकत नाही, पुरेसे पैसे नसल्याने आम्ही आर्थिक किंवा पुरेस शिक्षण कौशल्य नसल्याने काही कुठली मदत

करू शकत नाही. मग आम्ही कसे सोबती ? मला माझे स्व:ताचे रोजचे काम उरकत नाही किंवा आवड आहे तर वेळेची मर्यादा आहे तेव्हा आम्ही कसे सोबती? असे विविध प्रश्न पडू शकतात.

तर नाही ....

प्रत्येक जन सोबती आहे व प्रत्येक जन सोबती होऊ शकतो ह्या प्रवासाचा. अगदी आहे तिथच राहून .

१. जागरूक राहून स्वतः बद्दल, स्वतःच्या कुटुंबाबद्दल समाजाबद्दल , पर्यावरणाबद्दल त्याच्या गरजा, आवश्यकता आणि हक्कांसाठी
२. स्वतःला , कुटुंबाला,समाजाला व जीवसृष्टीला हानी पोचेल अशी कुठलीही कृती न करून
३. स्वतःचा, कुटुंबाचा व समाजाबद्दल आदर भाव बाळगून
४. व्यक्ती, कुटुंब व समाज स्तरावर होत असलेला अन्याय , अत्याचार व समाजविघातक गोष्टीसाठी उभ राहून .

पण हे सगळ ....

कशासाठी .... ?

जीवसृष्टीचा व त्यातील मानव वंशाचा मागील इतिहास ते पुढील प्रवास पाहता आताच्या घटकेला मानवाने भरपूर प्रगती केली असली तरी अनेक अडचणी व प्रश्नही आहेत .उदा. पर्यावरण, शिक्षण, रोजगार, राजकारण, पाणी, प्राणीवंश, आरोग्य इत्यादी व अनेक त्याचसोबत त्याच्या माया, मोह, मद, मत्सर, लोभ, याने जाती, धर्म, गरीबी अज्ञान अशी दरी सुद्धा निर्माण केली .

जीवसृष्टीतला प्रत्येक माणूस हा समान जन्माला येत असला तरी लिंग, समूह, वंश, देश, जात, धर्म यातील भेदाभेदाच जे दुख आपण मानवाने निर्माण केलय ते कष्टप्रद आहे . शहर खेड, गरीब श्रीमंत, लहान मोठा, शिक्षित अशिक्षित, काळा गोरा हा होणारा भेद दुख निर्माण करणारा आहे .

त्याचे निर्मुलन करून ममत्व भाव निर्माण होऊन, विविध आणि वैविध्यपुर्ण दशेत आणि परिस्थितीत आपण सर्वे असलो तरी त्यात समता नांदावी याचसाठी तर हा प्रवास. आपला सर्वांचा.

माणसाच्या मनात, जीवनात उभ्या झालेल्या असमानतेच्या अंधारात समानता आणण्यासाठी .

समांतर विचार करताना लक्षात येत कि, आपल्या अवतीभोवती अनेक प्रश्न आहेत. व्यक्ती, कुटुंब आणि समाज अशा तिनी स्तरावर यासाठी काम करणे आवश्यक आहे. कुठल्याही स्तरावर काम करता येणाऱ्या मर्यादा पाहता एका वेळी एकाच प्रश्नावर काम करता येने शक्य आहे, त्यामुळे आपल्या कडे असणाऱ्या कौशल्याचा,जे कुठल असेल त्याचा उपयोग स्वहितासाठी व समाजहितासाठी करणे हे ध्येय असावे.

असाच विचार करतांना, प्रश्न पडला माझ्याकडे काय आहे. तर वैद्यकीय शिक्षण आहे. मग त्याचा उपयोग, मी, माझे कुटुंब, माझे मित्र, आम्ही सगळे मिळून आमच्या स्वतःसाठी व आम्ही राहतो त्या आपल्या समाजासाठी काही करू शकतो का ?

विचार करत असता काही गोष्टी लक्षात आल्या कि

आरोग्य हि प्रत्येकाची महत्वाची गरज आणि अधिकार आहे . सर्वदूर पसरलेल्या मानवसमाजात अस लक्षात येत कि आरोग्याच्या सुविधा ह्या शहराच्या केंद्रस्थानी असून ह्या श्रमिक, कृषक तसेच आदिम वर्गाच्या आवाक्याबाहेर आहेत. मर्यादीत खर्चात उपलब्ध असलेल्या शासकीय सेवा या ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात दर्जेदार नाहीत व आवश्यक वेळेत उपलब्ध होत नाहीत. आरोग्यासाठी कुणाचेहि कुटुंब वेगळी तरतूद म्हणून करून ठेवत नाहीत व अज्ञान, अंधश्रधा यातून मुक्त होत योग्य औषधोपचाराचा आधार लोक घेतात हे दिसत नाहीत.

म्हणून ह्या प्रश्नांची उकल करत

आरोग्याची सेवा उपलब्ध नाही अशा ग्रामीण क्षेत्रात, पर्याप्त परवडेल अशा स्वस्त दरात, स्वतःच्या व समाजाच्या आरोग्याप्रती जवाबदार राहून आरोग्य सेवा द्देण्याचे व सुधृढ समाज आरोग्य निर्माण करण्याचे स्वप्न मी, माझ्या कुटुंबांनी, माझ्या मित्रांनी, आम्ही सर्वांनी पाहिले व याकरिता कटिबद्ध आहोत

त्यातून निर्माण झालेली आमची हि सोबत समाजाच्या सुधृढ सृजनशील आरोग्यासाठी आहे व सदैव राहील.

गरीब–श्रीमंत, शहर–खेड, जाती पातीचा भेद बाजूला ठेवत उत्तम आरोग्य सेवा हि प्रत्येकाची गरज आहे हे लक्षात घेत, समाजातील या दरीला कमी करत **समता निर्माण करण्यासाठी** छोटासा प्रयत्न .

आमचे जाणीव रुग्णालय गेवरा बूज .

– डॉ. सुरज माधुरी राजेंद्र म्हस्के

माझा सोबत पर्यंतचा प्रवास

दुर्गम आदिवासी व ग्रामीण भागात आरोग्यसेवा पोचवणे व संबंधित विषयावर अभ्यास करुन त्याचा उपयोग दुर्गम भागासाठी कसा करता येईल या करीता मन प्रेरीत होते.

महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यावर विविध संस्थांमध्ये ज्या दुर्गम भागात कार्यरत आहेत त्यातून म्हणजे शोधग्राम, चातगाव, शहीद रुग्णालय दल्लीराजहरा, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम येथे अनुक्रमे आरोग्य सेवा देण्यासोबत शिक्षण सुरु होते. गर्दीच्या ठिकाणी गर्दी करण्या पेक्षा जिथे आरोग्य सेवेची गरज आहे तिथे आरोग्य सेवा देता यावी या उद्देशाने शोध सुरु होता. त्याचा भाग म्हणून आम्ही काही मित्र परिसराचा अभ्यास करत होतो . दरम्यान अन्यत्र भटकण्यापेक्षा स्व जिल्ह्याचा अभ्यास करावा असे ठरले व त्या दरम्यान लक्षात आले कि आपल्या जिल्ह्यात सावली सिंदेवाही, ब्रम्हपुरीचा विस्तीर्ण जंगलव्याप्त भूप्रदेश सार्वत्रिकरित्या जिल्ह्याच्या इतर भागापेक्षा मागास आहे . तेव्हा आपण इथे काम केले पाहिजे.

त्याच वेळी मनात एक दुसरा प्रश्न उपस्थित होता कि काम कुठल्या पद्धतीने करावे. खाजगी व्यवस्था म्हणून, संस्था म्हणून, कि शासकीय व्यवस्थेमार्फत. सेवा तर सर्वच अंगाने करता येते. पर्यायी भांडवलाचा विचार करता मुबलक भांडवल व मनुष्यबळ शासकीय व्यवस्थेत उपलब्ध असते. खाजगी व्यवस्था उभी करायला भांडवल बहुत लागत व बहुतांश वेळ हा भांडवलाचा विचार करण्यात निघून जातो आणि सेवा दुरावते. आणि संस्थेतून सेवा उभी करायला आपण कितपत समर्थ आहोत हा प्रश्न होता? तेव्हा त्यापेक्षा हा सर्व विचार सोडता शासकीय सेवेतून आपण उत्तम सेवा व लाभ देऊ शकतो हा मानस होता. प्राथमिकतः असे असले तरी विविध संस्थांमधून काम करताना व शिबीर यांच्या माध्यमातून मित्रांशी चर्चा होताना विविध व्यवस्थेतल्या क्रमप्राप्त अडचणी, गुणवत्ता स्तर व संधी याची कल्पना येत होती. शासकीय व्यवस्थेतील औदासिन्य व ढिसाळपणा जाणून होतो. संस्थेतील कामाचा अनुभव काहीसा होता मात्र शासकीय व्यवस्थेत स्वतःला काम करताना तपासून पहायचे होते. कारण अनेक ज्येष्ठ व सहकारी या व्यवस्थेतून उत्तम सेवा देत होते व आहेत .

म्हणून सेवेसाठी निवडलेल्या, सावली क्षेत्रातील अंतरगाव परिसरातील अंतरगाव आरोग्य वर्धिनी केंद्रात जे व्यवस्थेकरिता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जी. परिषदेंतर्गत येत, त्यात वैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू झालो.

जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवर असलेला हा भूप्रदेश आहे, याच्या पूर्वेला सिंदेवाही, उत्तरेला ब्रम्हपुरी व दक्षिणेला पोमभुर्णा तालुक्याचा चा जंगलप्रदेश असून पश्चिमेला वैनगंगा व त्यापलीकडे गडचिरोली जिल्ह्याचा दुर्गम प्रदेश लागतो.

मुख्यत्वे धान पिकावर अवलंबून असलेला हा प्रदेश गडचीरोलीस समांतर आहे. कुठल्याही औद्योगिक विकासापासून दूर असलेला ह्या प्रदेशात उदरनिर्वाहाचे दुसरे साधन उपलब्ध नाही त्यामुळे लोक वर्षातील बहुतांश काळ कामासाठी आंध्रप्रदेश, पश्चिम महाराष्ट्र, वऱ्हाड याठिकाणी स्थलांतरण करून असतात. पर्यायी कुटुंब व्यवस्था ढासळते आणि चक्र बिघडते .

रुजू झालो त्यावेळी

कुठल्याही शासकीय व्यवस्थेत असावी तशिच आरोग्य वर्धिनी केंद्राची वास्तू व व्यवस्था इथे होती मात्र सार्वत्रिक पद्धतीने ती दुर्लक्षित होती . म्हणजे

१. वास्तू मध्ये वीज , पाणी व शौचालयाची व परिसर स्वचतेची व्यवस्था नव्हती

२. रुग्नालयातील साहित्य मोडकळीस आलेले व खराब अवस्थेत होते .

३. रुग्णालयातील बहुतांश खोल्या वापरीत नसल्याने बंद होत्या

४. औषध व आवश्यक वस्तू पुरवठा नव्हता

५. तपासणीच्या पद्धतीत गडबड होती

६. तसेच कामकाजात व वेळापत्रकात सुसूत्रता नव्हती

७. कार्यरत वैद्यकीय अधिकारी मानसिक आजाराने ग्रासित होते व कार्यकारी प्रमुख वास्तवात रहात नव्हते असे व अनेक प्रश्न होते.

शासकीय व्यवस्थेचे अधिकारी म्हणून संचलन करण्यासाठी आवश्यक क्रमप्राप्त गोष्टी केल्या. शासकीय व्यवस्थेत काम करत असताना सहकार्यांना चांगल्या अधिकाऱ्याची आवड असते, हे लक्षात येत होते. त्यामुळे प्रोत्साहन मिळून उत्तम काम करता येईल असे वाटत होते. बरेच वर्ष मरगळ असलेल्या व्यवस्थेत कामाची आवड निर्माण करताना छोट्या मोठ्या अडचणी येत होत्या, मात्र सर्वे तितक्याच आनंदाने सहकार्य करत होते. स्थानिक परिसरातील नागरिक कामामुळे खुश होतायत हे दिसत होते . कर्मचारी वर्गाला थोडा त्रास होत होता मात्र तरीही ते आवडीने काम करत होते .

अडचण उभी झाली ती स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकारणामुळे व त्यातून साध्य करायच्या त्यांच्या आर्थिक हेतूमुळे. स्व हितासाठी आपण सर्वांचे अहित करतोय ह्या गोष्टीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्याची राजकीय वृत्ती धोकादायक आणि विखारी वाटली व

आहे. त्यातून अल्प कालावधीत झालेली बदली व विटंबना करण्याचा प्रयत्न बालिश वाटला.

कोविड मधील सेवा आणि आरोग्य वर्धिनी केंद्राचा कायापालट करण्यात मला आलेल्या यशाचे पर्यवसान लोकांनी झालेली बदली रोखून केले. लोकांकडून मिळालेले कौतुक अधिकारी वर्गाकडून प्राप्त होणार्या कार्यालयीन प्रशस्तीपत्रापेक्षा, आणि राजकारणी लोकांकडून मिळणाऱ्या प्रसिद्धीपुर्ती मर्यादित पुरस्कारापेक्षा अधिक होते. मात्र त्यानंतर विखारी वृत्तीच्या बालिश राजकारणी लोकांनी व्यवस्थेतील अपरिपक्व दुतोंडी अधिकारी वर्गाचा उपयोग करत माता मृत्यूचा आरोप लावत पुनश्च बदली करण्यात आली.

यानिमित्याने व्यवस्था आणि राजकीय हेतू दोन्ही बद्दल मनात प्रश्न उपस्थित झाले आणि विचार करायला उद्युक्त केले

कोणते प्रश्न?

१. माता मृत्यू नक्कीच झाला होता, मात्र डोळस समीक्षा केली का?

२. केली तर माता मृत्यूची नेमकी कारणे कोणती होती?

३. आणि बदली करून तो दुरुस्त होतो का?

४. बदली केल्यावर अशी काय व्यवस्था केली कि परिसरात एकही माता मृत्यू होणार नाही?

५. राजकीय आकसापोटी व आर्थिक लाभासाठी आरोग्यासारख्या अत्यावश्यक व्यवस्थेला किती वेठीस धरावे

६. लोकसहकार्य आणि कौतुक व समाधान असले तरी मला किती सहजता आहे अशा व्यवस्थेत सेवा पुरविताना

७. मी माझा पुरेसा वेळ ज्या कामासाठी दिला पाहिजे ते देऊ शकतोय का? कि अन्यत्र गोष्टीतच वेळ जातोय.

कारण खूप वेळ ह्या भानगडींमध्ये जाऊ लागला होता , त्यामुळे आपण कशासाठी आलो, आपला उद्देश्य काय हा प्रश्न पडू लागला. शासकीय व्यवस्थेत वावरताना आहे त्या परिस्थितीत काम करणे क्रमप्राप्त होते. भ्रष्ट राजकारणी आणि त्यांच्या हाती बाहुलेरूपी वावरणारे अधिकारी यांच्या समवेत त्याच पद्धतीने काम करणे अवघड होते . माझ्या दृष्टीने पुरेसे समाधानकारक नव्हते .

पंचायती राज अंतर्गत येणाऱ्या या व्यवस्थेला आरोग्य सेवेपेक्षा व्यवस्थेतील राजकारणामध्ये विशेष रस असल्याने. मी राजीनामा दिला . पंचायत व्यवस्थे अंतर्गत येणाऱ्या आरोग्य विभागाने अद्याप राजीनामा का स्वीकारला नाही हा प्रश्न आहे?

त्यामुळे आपण ज्या उद्देशाने ग्रामीण आदिवासी क्षेत्रात कार्यरत राहायचे स्वप्न व ध्येय ठेवले होते त्याला धरुन हे नव्हते. त्यामुळे शासकीय व्यवस्थेतून बाहेर पडून वेगळ्या पद्धतीने स्वतंत्र रित्या काम करायचे ठरवले . आरोग्य वर्धिनी केंद्र अंतरगाव येथे कार्यरत असताना, परिसरातील गावांमधून जाताना अंगणवाडी, ग्रामपंचायत आणि इतर ग्रामप्रशासनातील व व्यवस्थांचा अभ्यास होत असताना आरोग्याच्या व इतर समस्यांशी ओळख होत होती. गावस्तरावरील विविध लोकांशी चर्चा होताना त्याची भीषणता समजत होती .

कुठल्या व्यवस्थेतून काम करावे हा मनातला द्वंद्व सुटलेला नव्हता. मात्र जे पूर्वी कळले होते त्यावरच पुन्हा पोचलो. अडचणी आणि प्रश्न, गुण दोष प्रत्येक प्रकारच्या प्रकारच्या व्यवस्थेत आहेत. शासकीय व्यवस्थेत आहेत तशाच संस्थात्मक कामात आहेत. तशाच खाजगी व्यवस्थेत आहेत. मात्र समर्पक सामाजिक उदेश जागृत ठेवून कार्यरत राहताना संस्थात्मक पद्धतीने काम करणे आताच्या घडीला जास्त कुशल वाटत आहे. त्यामुळे हा मार्ग निवडून स्थानिकांच्या सहभागातून, समविचारी मित्रांच्या सहकार्याने ह्या प्रकल्पाची सुरुवात आम्ही एक छोट्याश्या कार्यालयात केली व त्यातून जन्माला आली आमची हि...... सोबत नावाची छोटीशी संस्था.

ग्रामीण आरोग्याच्या स्वप्नाने प्रेरित होऊन इथपर्यंतचा हा प्रवास आहे. संपूर्ण आरोग्याच्या ध्यासाने सुरु झालेल्या प्रवासाला दिलेलं पहिलं वहील मूर्त रुप म्हणजे, आमचं

जाणिव रुग्णालय, गेवरा बुज.

– डॉ. सुरज माधुरी राजेंद्र म्हस्के

लोकाधार

आम्ही सगळे :- आमच्या स्वतःच्या , आमच्या कुटुंबाच्या , आम्ही राहतो त्या समाजाच्या आरोग्यासाठी.

आम्ही सगळे आरोग्यव्रती

अकरा वर्षापूर्वी आजोबांच्या प्रेरणेतून कौटुंबिक वैयक्तिक असलेला हा प्रवास कधी सामुहिक व्हायला लागला आणि झाला कळले नाही. हा प्रवास विचारपूर्वक जरी असला, तरी सर्वांसाठी हा विचारप्रवास नवीन होता. ज्या सहजतेने सर्वांनी ह्या कृतीत स्वतःला आपापल्या कुटुंबासमवेत सामावून घेतले त्याचे खूप अप्रूप वाटते .

ज्या सर्वांपुढे मी हा विचार ठेवला ते सर्व वेगवेगळ्या कौटुंबिक पार्श्वभूमीतून आहेत . प्रत्येकाचा बौद्धिक शैक्षणिक व सामाजिक स्तर वेगवेगळा आहे. आणि त्याही पेक्षा सगळे ग्रामीण क्षेत्रात राहणारे आहेत. प्रत्येक जन स्वःताच्या रोजच्या जगण्यासाठी ग्रामीण क्षेत्रात उद्भवणाऱ्या सर्व समस्यांसकट जगत आहेत. अश्या परीस्थिती मध्ये स्वतःच्या जबाबदाऱ्यांच्या सोबतीने सामाजिक भान बाळगत कार्यात सहभागी होणे हे सुंदर व विलक्षन आहे. माझ्यासाठी हे उत्साह वाढविणारे आहे. कारण ज्या शहरी समाजातून मी येतो तिथे आता जी परिस्थिती निर्माण झालीय आणि स्वतःच्या व्यतिरिक्त विचार करून काही वेगळ करण्याची वृत्ती दिसेनाशी झालीय तिथे असे सहकारी मिळणे खूप समाधानकारक वाटते .

सर्वांच्या सोबतीने अगदी सहजतेने विषयाला समजून घेत आणि वेळोवेळी पडलेले प्रश्न उपस्थित करत आणि आवश्यकता पडल्यास तेवढ्याच तीव्रतेने भांडत हा प्रवास मागील वर्षभरापासून सुरु आहे.

ज्या परिस्थितीत आम्ही रुग्णालय सुरु करायचं ठरवलं हे तेवढच कठीण काम होत. सर्व डॉक्टर मित्र मंडळी म्हणत होती कि हे इतक्या अचानक कसे शक्य आहे. मात्र सर्व स्थानिक सहकारी मित्र म्हणत होते कि होऊन जाईल. हे होऊन जाईल च कधी होऊन गेल हे कळलच नाही.

खूप गोष्टी होत्या, रूम शोधणे, त्याची रंग रंगोटी, पाण्याची व्यवस्था, लाईट व्यवस्था , दवाखान्याच्या हिशोबाने रूम व्यवस्था, साहित्य खरेदी, सामानाची रहदारी, सिस्टर आणि इतर लोकांची जुळवाजुळव, मंडप व्यवस्था आणि बरच काही. सर्वांच्या सहकार्याने सोबतीने

सहकार्याने सोबतीने सर्व व्यवस्था होत उद्घाटनाचा दिवस उजळला .

गेवरा परिसरातील, अंतरगाव, निमगाव, आकापूर , निफंद्रा, करोली , चिखली , चक, विरखल , थेरगाव, दाबगाव, बेलगाव, नवेगाव, उसरपार, मेहा, अंतरगाव टोला , गेवरा खुर्द, कसरगाव, डोंगरगाव, बोरमाळा, विहीरगाव, खानाबाद, उसरपार चक, पालेबारसा, सायखेडा ईत्यादी विविध सहकारी मित्र आणि सहकारी लोक यांच्या उपस्थितीत आणि सोबतीने रुग्णालयाचे सुंदर उद्घाटन झाले.

गेवरा बूज गावातील ज्येष्ठ नागरिक स्व. श्रीहरी दांडेकर आणि श्रीमती सखुबाई श्रीरामे यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला कार्यक्रमाला मजूर संघटनेने उभारलेल्या छत्तीसगढ राज्यात स्थित शहीद रुग्णालयातील गणमान्य सिस्टर व सहकारी उपस्थित होत्या.

तिथ पासून हा प्रवास गेल्या वर्षभरापासून अविरत सुरु आहे

प्रत्येकाच योगदान यात आहे आणि हाच या उपक्रमाचा लोकाधार आहे. आमच्यातील प्रत्येक जन आपल्या वृत्तीने व ताकतीने जमेल तेवढ याकरिता करत असतो .

केवळ एका ध्येयासाठी : आपल्या स्वतःच्या, आपल्या कुटुंबाच्या आणि आपण राहतो त्या समाजाच्या उत्तम आरोग्यासाठी

आमच रुग्णालय : जाणीव रुगणालय , गेवरा बूज

सर्व संस्था सदस्य,

रुग्णालय समन्वय समिती व मित्र परिवार

जाणीव रुग्णालय गेवरा बूज

सोबतच्या साथींनी जाणीव रुग्णालय या आपल्या पहिल्या वहिल्या उपक्रमाची सुरुवात १ जानेवारी २०२१ रोजी केली. आज त्याला एक वर्ष पूर्ण होत आहे .

गेवरा बूज येथे किरायाने असलेल्या ६ खोल्यांच्या घरात ९ कार्यकर्त्यांच्या साथीने उपक्रम सुरु झाला. रुग्णालय कार्यकर्ते, रुग्णालय कार्यकारी समिती, रुग्णालय समन्वय समिती, स्थानिक संस्था सदस्य व संस्थेचे सहकारी मित्र व सोबतच्या अन्य सहकारी संस्था यांच्या सोबतीने खालील उपक्रम गेल्या वर्षभरापासून राबविण्यात येत आहेत.

१. ९ ते २ या कालावधीत नियमित बाह्यरुग्ण सेवा (ओ.पी.डी. शुल्क रु.२०/-)
२. २४ तास आकस्मिक सेवा
३. ऑक्सिजन युक्त रुग्णवाहिका
४. प्रयोगशाळा
५. स्वस्त दरात जेनेरिक औषधे
६. ड्रेसिंग ची व्यवस्था

तसेच आकस्मिक आपत्कालीन गावपातळीवरील रोगनिदान शिबीर गरजेनुसार घेण्यात आले

कोविड दरम्यान परिसरातील १७ ग्रामपंचायती व आरोग्य वर्धिनी केंद्र अंतरगाव यांच्या सोबतीने प्रविणभाऊ आडेपवार महाविद्यालय निफंद्रा येथे कोविड केअर सेंटर च्या माध्यमातून विनामोबदला सेवा देण्यात आली. अतिरिक आकस्मिक सेवेकरिता विकास विद्यालय विहीरगाव येथे व्यवस्था करण्यात आली होती .

जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२१ दरम्यान जाणीव रुग्णालय गेवरा बूज. संयुक्तीकपणे केलेल्या कामगिरीचा आलेख खालील प्रमाणे .

१. बाह्य रुग्णसेवेचा आलेख

एकूण दिवस ओपिडी : २७४ एकूण रुग्णभेटी : १४,७९९

एकूण स्त्री : ६०४२ एकूण पुरुष : ५६३३ एकूण लहान मुले : ३१२४



२. विविध आजारांच्या रुग्णाचे विवरण:



वर्षभरात आम्हाला लक्षात आलेल्या काही समस्या

१. अनेक वर्षांपासून योग्य आरोग्यव्यवस्थेच्या अभावी लोक परंपरागत वैद्य व बोगस डॉक्टरांवर जास्त प्रमाणात अवलंबून आहेत. त्यामुळे लोक वेळेत दवाखान्यात येत नाहीत .

२. स्थलांतरणामुळे घरातील तरुण मुले बाहेर असल्याने व रहदारीची साधने नसल्याने वयस्क लोकाना दवाखान्यात पोचायला अडचण होते . त्यामुळे बिपी शुगर च्या गोळ्या

नियमित घेऊ शकत नाहीत

३. वाघाच्या दहशतीने महिला वर्ग व वयस्कर लोक व ज्यांच्या कडे रहदारीसाठी साधन नाही ते दवाखान्यापर्यंत पोचू शकत नाही.

४. खर्रा व त्यामुळे होणारे मुखरोगाचे प्रमाण भरपूर आढळून येते , त्यामुळे हि गंभीर समस्या आहे. दारु व इतर व्यसनांमुळे बिघडणारी कुटुंबाची आर्थिक घडी ही सुद्धा भिषण आहे.

५. अशुद्ध पाणी पुरवठा व अतिक्षारयुक्त पाणी, परिसरातील नागरिकांमध्ये आरोग्याच्या समस्या निर्माण करणारा आहे

६. खराब तलाव व त्यातील पाणी यामुळे होणारे त्वचा विकार व पोटदुखी संबंधी विकार सर्वाधिक आहेत .

७. मानसिक आरोग्याचे रुग्ण, औषधी उपलब्ध नसल्याने व उदासीनतेने उपचाराअभावी बघायला मिळतात

८. वंध्यत्व, कमी वयातील मातृत्व, कुमारी माता ओपीडी मध्ये येतात तेव्हा प्रश्न पडतो

९. शुगर च्या गोळ्या योग्य पद्धतीने न घेतल्याने डायबेटिक फुट चे प्रमाण बऱ्यापैकी प्रमाणात आढळून येते

अशा अनेक प्रश्नाची ओळख आम्हाला गेल्या वर्षभरात झाली .

येणाऱ्या वर्षात किमान एका तरी प्रश्न आम्हाला सोडविता येईल याकरिता आमची टीम प्रयत्नरत राहील .

– रुग्णालय टीम

गेवरा परिसरातील प्रसूतीची समस्या :

आमचे रुग्णालय चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यातील व्याहाड ते गांगलवाडी मार्गावर वसलेल्या गेवरा या खेडेगावात संस्थेच्या व लोकांच्या माध्यमातून रुग्णालय सुरु करण्यात आला. या गावाच्या आजू बाजूला जंगल परिसर असून रह्दारीकारिता अत्यल्प सुविधा उपलब्ध आहेत.

जिल्हा रुग्णालय येथून ९० कि.मी.वर असून ग्रामीण रुग्णालय हे ३० किमी अंतरावर आहे. जवळ पास १० कि.मी. वर प्राथमिक आरोग्य केंद्र आहे व या गावात आरोग्य वर्धिनी केंद्राचे उपकेंद्र असून तिथे प्रसूतीची व्यवस्था आहे.

प्रसुतीकारिता सरकारी व्यवस्था असल्या कारणाने आम्ही प्रसूतीची व्यवस्था आमच्या रुग्णालयात उभारलेली नाही. शासकीय व्यवस्थेमार्फत विनामूल्य नउ महिने तपासणी व प्रसूती आणि त्यादरम्यान विविध योजना मार्फत सुविधा पुरविल्या जातात, त्याचा योग्य लाभ मिळावा . मात्र उपकेंद्रात परिचारिका हजर रहात नाही, साहित्याच्या अनुपलब्धतेमुळे सर्व सुविधा नागरिकांना मिळत नाहीत आणि प्रसुतीच्या वेळेला सुद्धा गैरसोय होते.

जेव्हा लोक आशेने आमच्या कडे येतात तेव्हा मग कस करायच हा मोठा प्रश्न आम्हाला पडतो ?

मागील वर्षभरात आम्हाला अशा पद्धतीने सहा ते सात प्रसुतीनं सामोरी जावे लागले . परिचारीका हजर नसल्याने रुग्णांनी बोलाविल्याने आम्ही दोन प्रसूती उपकेंद्रात जाऊन केल्या. तसेच दोन प्रसूती ह्या रेफर करायला कालावधी नसल्याने व उपकेंद्रात कोणी नसल्याने आमच्या रुग्नालयात झाल्या. तसेच तीन प्रसूती ह्या आमच्या रुग्ण वाहिकेत तसेच आमच्या रुग्णवाहिकेने पोचता करताच झाल्या.

तसेच काही लोकांनी उपस्थित केलेले प्रश्न

१. गडचिरोलीला डिलेव्हरी नॉर्मल झाली मग रेफर का बर केली होती.

२. सिकल सेल, एचआयव्ही, हिपॅटयटीस बी, ब्लड गृप, व्हीडीआरएल हे आरोग्य केंद्रात फ्री द्यायला पाहिजेन जी, का बर मिळत नाही.

पडलेले प्रश्न ?

१. व्यवस्था असताना केवळ गैरहजरीने व साहित्य उपलब्ध नसल्याने लोकांना प्रसूती

सारखी सेवा मिळत नसेल तर व्यवस्थेचे काय करावे ?

२. आमच्या रुग्णवाहिकेत प्रसूती होऊ शकते तर ती उपकेंद्रात का होऊ शकत नाही ?
३. रेफर झालेल्या महिला नॉर्मल प्रसूत होतात तर त्या रेफर का होतात ?

आणि आम्ही काय करावे ?

आम्हाला आनंद होतो कि लोक गरोदर पनातील मासिक तपासणी करिता आमच्याकडे विश्वासाने येतात, त्याच बरोबर सर्व रक्त तपासण्या करुन घेतात .

मात्र त्या करिता मोफत व्यवस्था कार्यरत आहे त्यात काही होत नाही, योग्य पद्धतीने तपासणी तसेच इलाज होत नाही. ह्याच दुख वाटल्या वाचून राहत नाही

प्रसूती साठी उपलब्ध असलेली शासकीय व्यवस्था कशी सुधृढ होईल ह्यासाठी मन विचारमग्न होते ?

डॉ. सुरज माधुरी राजेंद्र म्हस्के
एम.बि.बि.एस.
(वैद्यकीय अधिकारी जा.रु.गेवरा बुज.)

अश्विनी सुनील मोहूर्ले
(आरोग्य सेविका जा.रु.गेवरा बुज.)

पडलेला प्रश्न

चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यापासून ३५ कि.मी अंतरावर वैनगंगा नदीच्या पूर्व दिशेस वसलेले गेवरा बूज हे खेड गाव..... शहरापासून खूप लांब आहे. ३० ते ४० गावात एम.बी.बी.एस. डॉक्टर नाहीत. लोकांना वेळेवर उपचार व औषधे मिळत नाहीत. सरकारी दवाखाने असून लोक त्यात का जात नाहीत? हा पडलेला प्रश्न आहे.
म्हणून लोकांना योग्य वेळेस उपचार मिळावा यासाठी आम्ही हि लोकांना एकत्रित करून दवाखाना सुरु केला.

शामराव भोयर वय वर्ष ४२, मुळचे गेवरा खुर्द या गावातील रहिवासी असून त्यांच्या कुटुंबात पत्नी व त्यांची १४ वर्षाची मुलगी राहते. त्यांना २ ते ३ वर्षापासून ब्लड कॅन्सर झालेला होता त्यांचा उपचार मेडीकल कॉलेज नागपूर मधून चालू होता . तिथे ते भरती हि होते त्यानंतर ते आमच्या रुग्णालयात आले त्याचं त्या वेळेस पोट दुखत आहे अस सांगितलं. सरांनी नंतर औषधोपचार दिला, पण त्यांनी त्या वेळेस मला कर्करोग आहे अस विचारुनही काही सांगितल नव्हत. त्यानंतर ते पुन्हा लघवीत त्रास होत आहे व पोट फुगाल्यासारखा वाटत आहे अस म्हणाले व मला कर्करोग झाला होता अस त्यांनी सांगितलं.

त्यावेळेस सर त्यांना रागावले की तुम्ही या अगोदर आले होते तेव्हा का बर सांगितले नव्हते? तर कोरोना आला, परीस्थीती ही त्याची हलाखीची होती. नागपूर पर्यंत जायला गाड्या बंद होत्या.त्यांची पत्नी एकटी कशी घेउन जाईल व गाडी करून जान परिस्थिती ठीक नसल्यामूळे शक्य नव्हत. त्यामुळे त्यांना वेळेवर औषधोपचार मिळाला नाही.व तब्येत पुन्हा बिघडली. त्यानंतर ते १२ नोव्हेंबर २०२१ ला आपल्या रुग्णालयात आले. त्यावेळेस पण त्याचं पोट दुखत होत व लघवी बंद झाली होती. तेव्हाही सरांनी त्याला औषधोपचार दिला होता व ते बरे झाले. त्यानंतर ते पुन्हा पुन्हा सतत रुग्णालयात येत होते. सरांनी त्याला समजावून सांगितलं की,तुम्ही माझ्याकडे येण्यापेक्षा दिवसेंदिवस तुमची तब्येत बिघडत आहे तर तुम्ही नागपूर ला मेडिकल कॉलेज ला आजच्या आज जाव लागेल व सगळ समजावून सांगितल आणि रेफर लिहून दिला व भर्ती व्हायला सांगितलं.

ते नंतर घरी गेले,व नागपूर न जाता ब्रम्हपुरी गेले तीत २ दिवस भरती राहले. तिथुन सुद्धा त्यांना नागपूर मेडिकल कॉलेज ला भरती व्हायला सांगितले मात्र ते तिथे न जाता गडचिरोली शासकीय रुग्णालयात गेला. व २२/११/२१ ला दुपारी २ वाजता मृत्युमुखी पडला.

प्रश्न पडतो कि रुग्ण नेमका कशामुळे दगावला ?

कु. कीर्ती पिंगे (आरोग्य सेविका जा.रु.गेवरा बुज.)

यशोगाथा

सुमनबाई देशमुख ह्या मूळच्या निफंद्रा या गावच्या रहिवासी आहेत. सुमनबाई हि १२ मार्च २०२१ ला पहिल्यांदा आमच्या रुग्णालयात आली होती,तेव्हा त्यांची शरीराची एक बाजू काम करत नव्हती. म्हणजेच डाव्याबाजूचे हात आणि पाय काम करत नव्हते.तेव्हा सरांनी तपासणी केली असता, लकवा आहे असे सांगत, प्राथमिक इलाज देऊन गडचिरोलीला सी.टी. स्कॅन काढण्याकरिता पाठविले. दुसऱ्या दिवशी ते रिपोर्ट घेऊन रुग्णालयात आले. सरांनी रिपोर्ट बघितला व त्यांना का व कुठल्या प्रकरचा लकवा मारला हे सांगितले. दोन दिवस ती आमच्या रुग्णालयात राहिली. सरांनी औषधोपचार सुरु केले,व त्यासोबत त्यांना व्यायाम शिकवला. तिला लघवीची नळी लाऊन दिली. घरी गेल्यानंतर २ महिने सतत व्यायाम करायला व सोबतच औषधोपचार चालू ठेवण्यास सांगितले व आवश्यक काळजी घरच्यांना घ्यायला सांगितली.

त्यानंतर त्या परत एप्रिल महिन्यात आल्या तेव्हा ती तशीच होती. अगोदर पेक्षा त्यांच्या तब्येतीत थोडी फार सुधारणा झालेली होती. नंतर सरांनी तपासणी केली व पहिले. सांगितल की प्रत्येक महिन्यात येत रहा. तुम्हाला बर व्हायला वेळ लागेल असे सांगितले. नंतर त्या प्रत्येक महिन्यात न चुकता रुग्णालयात येत आहेत .३ महिन्यानी त्या रुग्णालयात आल्या त्या वेळेस ती स्वतः चालत आल्या तेव्हा त्यांना चालताना पाहून खरच खूप छान वाटल व त्यांना विचारल आजी आता तुम्हाला कस वाटत आहे तर त्यांनी सांगितल कि आता बर वाटत आहे.त्या दिवशी त्या पण खूप आनंदी होत्या व त्याची प्रकृती बरी झाली होती. स्वतः चालायला लागली होती. आता त्या न चुकता प्रत्येक महिन्यात चालत रुग्णालयात येत आहेत खरच त्यांना चालताना पाहून खूप छान वाटल ....

कु. कीर्ती श्रीधर पिंगे ,

(आरोग्य सेविका , जाणिव रुग्णालय , गेवरा बुज.)

सावली तालुक्यापासून ३५ कि.मी अंतरावरील वैनगंगा नदीच्या पूर्व दिशेस वसलेले गेवरा बूज हे एक छोट खेडे गाव आहे.

विलास रामटेके हे मुळचे गेवरा बुज. या गावचे रहिवासी आहेत. २३ नोव्हेंबर २१ रोजी ते आपल्या शेतात काम करण्याकरिता गेले असता त्यांना त्यांचेच शेतात साप चावला, त्यांना शेतामधून घरी नेल व त्यांना काही लोक दवाखान्यात नाही न्यायचं गावातील एका माणसाकडे पांडार टाकण्यासाठी नेऊ अस म्हणत होते. त्यांच्या पत्नी ने काही न एकता आमच्या रुग्णालयात आणले. सर नि रुग्णाला पाहिल्यावर, ब्लड घ्यायला सांगितल व एक तपासणी केली, त्या नंतर चावलेला साप विषारी आहे अस सांगून, चोवीस तास देखरेखीखाली राहण्याची आवश्यकता आहे व काही अन्य रक्त तपासण्या होणे गरजेचे आहे त्यामुळे तुम्हाला गडचिरोलीला ग्रामीण रुग्णालयात जाव लागते म्हणून रेफर लिहून दिले व ते आमच्या रुग्णालयातील रुग्णवाहिकेने गडचिरोलीला घेऊन गेले.

ग्रामीण रुग्णालयामध्ये ३ दिवस ते भरती होते त्यानंतर घरी आले . त्यानंतर ३ दिवसांनी पुन्हा ते आमच्या रुग्णालयात पाय दाखवण्याकरिता आले, त्यावेळेस त्यांच्या सोबत त्यांची पत्नी सुद्धा आली होती कसे आहात? विचारल तर ते ठीक झाले. आता बर झाल आम्ही लोकांच एकल नाही अस त्यांची पत्नी म्हणत होती. मात्र गावातील आजूबाजूच्या लोकांनी आमच्याशी बोलन बंद केल. आम्ही त्याचं ऐकले नव्हत म्हणून असे ते सांगत होते.

रुग्ण बरा झाला याचा आनंद होत होता, मात्र

हे ऐकून मनामध्ये विचार आला कि लोक अशा प्रकारच्या भीतीमुळे अजूनही किती रुग्ण रुग्णालयात येत नसावे .

रुग्णालय असूनही लोक का येत नाहीत हा एक पडलेला प्रश्न आहे ....

असे किती लोकांचे पाय खराब होत असतील ?

असे किती लोकांचे घरीच रुग्णालयात न येता मृत्यू होत असेल हा पण एक प्रश्नच आहे.....

कीर्ती श्रीधर पिंगे ,

(आरोग्य सेविका , जाणिव रुग्णालय , गेवरा बुज.)

कोविड केअर सेंटर

आपल्या देशात कोरोनाची पहिली लाट २०२० मध्ये आली. फेब्रूवारी २०२० ला चीन देशातील वूहान या शहरात पहिला रुग्ण आढळला.तसेच आपल्या देशात मार्च २०२० ला पहिला रुग्ण आढळला.

एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात चंद्रपूर जिल्हात पहिला रुग्ण आढळला.आपल्या परिसरातील लोक बाहेर राज्यात अडकले होते. आपल्या परिसराची आरोग्यव्यवस्था अंतरगाव आरोग्य वर्धिनी केंद्रावर अवलंबून असते , ज्यांअंतर्गत २५ गावातील २५००० लोकसंख्या येते. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माहितीनुसार सरासरी १५००० लोक बाहेर गावी , परराज्यात व अन्यत्र कामकाजासाठी गेले असता अडकले होते. लोकांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण तयार झाले होते. आल्यावर गावात काय होईल याची कल्पना नव्हती. वेळोवेळी सरकारच्या सूचना वेगवेगळ्या येत होत्या त्यामुळे सर्व घाबरून होते. आल्यावर तपासणी करायला घाबरायचे. बाहेरून येणाऱ्या लोकांना १४ दिवस क्वारंटाईन म्हणून शाळेत ठेवण्यात येत होते. त्या काळात पोलीस, ग्रामप्रशासन व सरकारी व्यवस्था सक्तीने वागत होती. त्यामुळे सर्वत्र गोंधळाचे वातावरण तयार झाले होते .

पहिली लाट स्थिरावल्या नंतर देशातील, राज्यातील, रुग्ण कमी व्हायला लागले. तसेच जिल्ह्यातील सुद्धा कमी झाले.जनजीवन पूर्ववत व्हायला आले होते.

दुसरी लाट एप्रिल २०२१ मध्ये आली.तेव्हा जाणीव रुग्रालय चालू झाले होते. दुसर्या लाटे दरम्यान रुग्णालयात वाढती रुग्णसंख्या पाहून रुग्णालयासमोर मंडप टाकून दमा खोकल्याचे पेशंट मंडपमध्ये तपासणी करायचे.व साधारण पेशंट रुग्णालयात चेक करायचे.आणि जे संशयित रुग्ण वाटत होते त्यांना आरोग्य वर्धिनी केंद्र अंतरगाव व आरोग्य वर्धिनी केंद्र मुडझा येथे जाऊन कोरोना टेस्ट करायला सांगायचे.जे पाझेटिव्ह रुग्ण आढळले त्यांना कोविड केअर सेंटर सावली येथे पाठवायचे.लोक त्याला सहमत नव्हते व घाबरून दवाखाण्यात यायचे नाही, हे आमच्या लक्षात आले. लोक विचारायचे तुम्ही आम्हाला नाही ठेवू शकत का ?

रुग्णालय नवीन असल्या कारणाने आणि पुरेशी साधन व्यवस्था नसल्याने आम्ही ते करू शकत नव्हतो, मात्र वाढत जाणारी गोंधळ जण्य परिस्थिती सुद्धा बघू शकत नव्हतो,

कारण लोक खूप घाबरले होते .

म्हणून आपल्या स्वतःसाठी आपल्या कुटुंबांसाठी आपल्या समाजातील आजूबाजूच्या लोकांसाठी सोबतच्या साथींनी बैठक घेऊन निफंद्रा व विहीरगाव येथे कोविड केअर सेंटर चालू करण्याचे ठरविले. प्रत्येक गावातील सरपंच लोकांना बोलावून मिटिंग घेण्यात आली व ग्रामपंचायती मार्फत मा.तहसीलदार यांना कळविले. मा. तहसीलदार व मा. सवँग विकास अधिकारी यांनी परिसरातील सरपंच व पोलीस पाटील यांना निफंद्रा येथील प्रविण भाऊ आडेपवार माध्यमिक विद्यालयात तात्काळ सभा बोलावून त्यांची विचारपूस करून निफंद्रा येथे कोविड केअर सेंटर सुरु करण्याची परवानगी दिली व जाणीव रुग्णालय गेवरा बुज यांना कळविले.

जाणीव रुग्णालय परिसरातील नागरिकांना विनामुल्य सेवा देणार अस मा . तहसीलदार यांनी सांगितले. आणि ५ मे २०२१ पासून आपण निफंद्रा येथे कोविड केअर सेंटर चालू झाले. कोविड केअर सेंटर चालू केल्यानंतर परिसरातील लोकांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले.कोविड केअर सेंटर मध्ये रुग्णांना झोपण्याकरिता बेडची व्यवस्था तहसील कार्यालय इथून करण्यात आली. कुलर, पंखे, पाण्याची व्यवस्था,जेवणाची व्यवस्था परिसरातील सर्व ग्रामपंचायतीने केली . आणि आरोग्य व्यवस्था जाणीव रुग्णालयाच्या टीमने पुरविली .

रुग्णांना दररोज ३ वेळा आपल्या रुग्णालयातील डॉक्टर जाऊन चेक करायचे.रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक असलेला औषधोपचार द्यायला सांगायचे.रुग्णांना वेळोवेळी सेवा देण्याकरिता सहकाऱ्यांची २४ तास ड्युटी लावली होती. त्यांची देखरेखी करिता जी.प.शाळेचे शिक्षक असायचे . पेशंटला सुट्टी द्यायची असली तर गाडी बोलावून त्यांना घरी सोडले जायचे व त्यांना ७ दिवस होम कोरोंटाईन राहायला सांगितल्या जायचं . ह्या सेवेचा लाभ परिसरातील नागरिकांनी घेतला.

जाणीव रुग्नालायामार्फात पुरवलेल्या कोविड सेवेचा तपशील

रेफर रुग्ण : ३

एकूण सेवेचा लाभ घेतलेले रुग्ण : २८

– **श्री. राजू मधुकर धोटे**, निफंद्रा .

खाज एक सार्वजनिक समस्या

आपला दवाखाना चालू केल्यापासून आपल्या दवाखान्यात खाजेचे रुग्ण जास्त प्रमाणात आले. खाज हा एक संसर्गजन्य रोग आहे .हा एक गंभीर स्वरूपाचा रोग आहे. हा रोग ग्रामीण भागात भरपूर प्रमाणात आढळतो. आपल्या भागात मुख्यतः खाज ही ६ प्रकारची आढळून येते .ते कोणकोणत्या प्रकारची आहे ते पुढीलप्रमाणे .....

१.खरुज २. गजकर्ण ३. एक्झिमा ४. साधीखाज ५. जंतदोष(इन्फेक्शन) ६. खसू.

अशा सहा प्रकारच्या खाजेचे दर्शन आपल्या भागात आपल्याला होते. हि खाज कोणकोणत्या कारणाने पसरते व कशामुळे होते ,ते पाहू.....

१. दुषित व साचलेल्या पाण्यात कपडे धुणे .

२. घरात असलेली अस्वच्छता.

३. खाज असलेल्या लोकांचे वापरलेले कपडे घालणे .

४. तलावावर कपडे धुणे.

वरील कारणांमुळे साधारणतः खाज होते किंवा पसरते. झालेली खाज कमी करण्यासाठी व तिच्यावर आळा घालण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्या व कोणती काळजी घेतली पाहिजे ते पुढीलप्रमाणे .....

१. खाज झाल्यावर दवाखान्यात जाऊन डॉ.च्या सल्लयाने औषधोपचार घेणे.

२. साचलेल्या पाण्यात कपडे धुणे बंद करणे .

३. तलावावर कपडे धुणे बंद करणे .

४. खाज असलेल्या व्यक्तीचे कपडे न घालणे .

५. धुतलेले कापडे कडक उन्हात वाळवणे.

वर सांगितलेले उपाय केले तर खाज कमी करता येईल व खाजेवर आळा बसवता येते मात्र लोक फक्त औषधोपचार घेतात. प्रतिबंधात्मक उपाय समजून घेऊन त्याप्रमाणे वागत नाहीत. त्यामुळे यावर काय व कसा मार्ग काढता येईल हा प्रश्न पडतो ?

विवेक दूमदेव राऊत

(आरोग्य सेवक जा.रु.गेवरा बुज.)

अनुभव

मी संस्थेत रुजू होण्यापूर्वी माझा आरोग्य क्षेत्राशी कसलाही व कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता. आरोग्य क्षेत्रात काम करण्याची आवड मनात होती,पण संधी मिळाली नाही. आरोग्य क्षेत्रात येण्यापूर्वी मला लोकांना जखमा झाल्यावर बघायला भीती वाटत नव्हती. जेव्हा रुग्णालयात रुजू झालो तेव्हा मला ड्रेसिंग विभागात काम करण्याची संधी मिळाली. मनात थोडी ख़ुशी झाली पण थोड वाईट पण वाटू लागल.कारण जखमा पाहिल्यावर कधी कधी जेवणाच्या वेळेत त्रास होत होत. नंतर समोर रुग्ण आल्यावर त्याला कोणत्या प्रकारची जखम झाली आहे हे बघून समजायला लागले.त्यावर कशापद्धतीने उपचार करून पट्टी बांधायची हे समजायला लागल. ग्रामीण भागातील लोकांना कोणतीही जखम झाले कि लोक त्याला महाडोर साप चावला असे समजून अंधश्रधेवर विश्वास ठेवून वैद्यकीय सल्ला न घेता मांत्रीकामार्फत फुक मारणे, भार टाकणे हे प्रकार करतात. याच्या नादात लोक आपल्या शरीराचा एक भाग खराब करतात.

मी आरोग्य क्षेत्रा काम करायला आल्यावर मला आरोग्याशी निगडीत थोड्या फार गोष्टी समजायला लागल्या. त्यात रक्तदाब, मधुमेह, लघवीतील जंतुदोष, ताप, लकवा, मानसिक आजार,या सारख्या आजाराबद्दल माहिती मिळायला लागली. आजार, त्यासंबंधी घ्यावयाची काळजी व त्यावर करायचे प्राथमिक उपचार बर्यापैकी माहित झाले.

रुग्णालयात रुजू झाल्यानंतर सगळेच काम माझे आहे ह्या वृतीने काम करणे आवश्यक आहे व चांगले आहे. पण जेव्हा काम करायची वेळ येते तेव्हा ते येत असून सुद्धा ते मला जमत नाही असे सांगणे चुकीचे आहे. काम करत असताना आपले काम कोणते हे समजले होते व मला ड्रेसिंग चे काम करणे होते. पण त्यासोबत वेळोवेळी येणारे हर प्रकारचे काम शिकत शिकत करत आहो व करतोय. त्यात आनंद वाटतो. कारण हे आमचे रुग्णालय आहे. आलेल्या रुग्णाच्या दुखापतीवर व जखमेवर मलम पट्टी करणे व त्यांना योग्य सल्ला देणे हे काम करायला मला आवडते.रुग्णाची सेवा करतांना त्यात मला समाधान मिळते.

रुग्णालयात काम करत असताना विना अनुभवावरून सुरुवात करणे व नवीन गोष्टी शिकणे थोड त्रासदायक होत. ड्रेसिंग चे मोठी जखम वाले २ रुग्ण आले. त्यांच्या पायाला जखम झाली होती.त्यांच्या पायाला झालेल्या दुखापतीवर पट्टी बांधून त्यांना समजावून सांगून

त्यांना धीर दिला.एक रुग्ण बरा होताच त्याच प्रकारच्या जखमेचा दुसरा रुग्ण रुग्णालयात आला.

त्याच्या पायाला अगोदर छोटीशी पिरी आली होती. ते मधुमेहाचे रुग्ण असल्यामुळे त्यांच्या जखमेत वाढ होत गेली. मधुमेह असल्यामुळे तुमची जखम सुकायला थोडा वेळ लागू शकते असे त्यांना पटवून दिले व त्यांना धीर दिला व मधुमेहाचा उपचार नियमित घ्यायला सांगितला.

काही अनुभव नसताना जखम बघण्याची हिम्मत असल्यामुळे रुग्णाच्या जखमेवर पट्टी करण्याचा अनुभव आला. रुग्णालयातील अशा व विविध प्रकारचे काम करून रुग्णाची सेवा करण्याची संधी मिळाली ह्याचा आनंद वाटतो व समाधान मिळते .

कु.विवेक टूमदेव राऊत
(आरोग्य सेवक जा.रु.गेवरा बुज.)

माझा प्रवास :

मी चंद्रपूर जिल्यातील सावली तालुक्यातील कापसी या खेडेगावातील रहीवासी आहे. मी गरीब कुटुंबात वाढलो. मी माझे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत व माध्यमिक शिक्षण गावातीलच भय्याजी पाटील भांडेकर हायस्कूल या शाळेत पूर्ण झाले. शिक्षण चालू असताना मी डॉ.पवन कवठे दादा यांच्या कडे दवाखान्यात काम करत होतो. समोरच शिक्षण काय कराव काही ठरलं नव्हत. दवाखान्यात काम करत असताना एकेदिवशी चिंता वाटत होती कि समोरच शिक्षण काय घ्याव काय नाही. सामाजिक कार्य करून कुटुंबाला कस चालवायच काही कळत नव्हत. कामामध्ये मन लागत नव्हता,पण कस तरी काम करून जीवन समोर जात होत. डॉ. पवन कवठे सर मला म्हटले, का? बर नाराज बसला आहेस. त्यांना सागितलं कि मला समोरच शिक्षण घ्यायच आहे. काय करायच काही कळत नाही आहे.आणि मला तर आरोग्य विभागातच काम करायचं आहे.त्यांनी मला सागितले तू विचार करू नको. तूझ्या समोरच शिक्षणाची सोय मी करणार असे म्हणून मला स्वत:च्या घरी घेउन गेले. मी त्याच्या घरी राहून त्याच्या सोबत काम करत होतो .त्यांनी मला DMLT करायचं असे ठरवले. मला खूप आनंद झाल आनंदात मी घरी परत गेलो.

बाबाला सांगीतलो कि समोरच शिक्षण आरोग्य विभागातच घ्यायच आहे.बाबांनी मला विचारले शिक्षनासाठी पैसे किती लागणार. मी तर पैशाचा विचारच केल नव्हता. मी परत दवाखान्यात गेलो आणि डॉक्टर दादाला विचारलो शिक्षणासाठी पैसे किती लागणार.त्यांनी माहिती करून सागितले कि ७० ते ८० हजार रुपये लागणार.मला तर धक्का बसला इतके पैसे बाबा कुठून आणणार. ताईच पण लग्न झाल होत. मी परत घरी गेलो.बाबांनी मला विचारले काउन उदास झाल. मी बाबांना सागितलं शिक्षणासाठी ७० ते ८० हजार रुपये लागणार शिक्षण घेणार नाही. इतके सारे पैसे तुमी आणणार कुठून. बाबांनी शिक्षणाची तयारी चालू कर पैसे देतो म्हणाले आणि शेतावर निघून गेले.दवाखान्यात काम करत असताना डॉ. थोडीफार मी मदत करतो असे म्हणून माझी गडचिरोली येथे

S.P.M.College येथे admission झाली. दवाखान्यात काम करून शिक्षण पूर्ण केलो.त्यांचा कडून जो मानधन मिळत होता. मात्र स्वतःचा पोट भरण्या इतका नव्हता. तरी पण मी त्यांच्या कडे ५ वर्ष समाज सेवा मनून काम करत होतो. काम करत असताना मला

एकेदिवशी प्रश्न पडला कुटुंबाला पकडून समाज सेवा कस करायचा हा प्रश्न पडला. काम करता करता बरेच दिवस निघून गेले.

एकेदिवशी मला माहिती मिळाली कि सावली तालुक्यात गेवरा खेडेगावात धर्मार्थ रुग्णालय होत आहे. आणि तेथे प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदाची जागा निघाली आहे. त्यासाठी मी फार्म भरला. आणि माझे जाणीव रुग्णालय गेवरा येथे सिलेक्शन प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून झाली. १ जानेवारी २०२१ ला जाणीव रुग्णालयात रुजू झालो.

जाणीव रुग्णालयात का रुजू झालो : व्याहाड ते गांगलवाडी जंगल परिसरातील लोकांना इलाजासाठी ४० ते ५० कि.मी. अंतर जावे लागत होता.त्या परिसरात रुग्णालय नसल्या मुळे आणि बाहेर जाण्यायेण्याची सोय नसल्यामुळे खूप अडचण भासत होती. डॉ.सुरज मस्के सर यांनी लोकांना योग्य इलाज व कमी खर्चात इलाज मीळावी म्हणून लोकांचा माध्यमातून जाणीव रुग्णालयाची निर्मिती केली. मला पण कुटुंबाला सामाऊन समाज सेवा करायचं होत. त्यामुळे मी निर्णय घेतला. आणि मी जाणीव रुग्णालयात प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून रुजू झालो.

रुग्णालयातील सुरुवातीचे कामे : रुग्णालयात कर्मचारी कमी असल्यामुळे व सफाई कर्मचारी म्हणून कोणी नसल्यामुळे मी सुरवातीत साफ सफाई करत होतो . मला प्रयोगशाळाचे तपासण्या पूर्णपणे येत नसल्यामुळे मला खूप अडचणी येत होत्या.मासिक अहवाल सादर कस करायचं ते पण येत नव्हते. स्टॉक बुक कस लिहायचं ते पण येत नव्हते. या सर्व कामात सर मला सुरवातीत मदत करत होते. सुरवातीत काम करत असताना खूप भीती वाटत होती कि मी शिकणार कि नाही.माझा सर्व कामात मदत करून समजून सांगत होते. कामाचा व्याप जास्त असल्यामुळे खूप दगदग हि होत होती.

प्रयोगशाळा : रुग्णांना कमी खर्चात योग्य तपासण्या व्हावी म्हणून सरांनी प्रयोगशाळा सुरु केली. ज्या रुग्णांना खरोखर गरज आहे, त्याच रुग्णाच्या तपासण्या केल्या जातात, विनाकारण गरज नसताना तपासणी केल्या जात नाही. सावली तालुक्यात सर्वात जास्त योग्य व कमी खर्चात तपासण्या आमच्या जाणीव रुग्णालयात होतात. हि आमची खासियत आहे .

वर्षभरातील कामे : पहिला वर्ष असल्यामुळे कर्मचार्यांना दगदग होहू नये मनून सरानी OPD चालू ठेवली आहे. आजूबाजूच्या परिसरात ५ ते ६ वेळा रोग निदान शिबीर पार पडले. देशामध्ये कोरोनाच्या महामारी मुळे समाजात भीतीचे खूप वातावरण झालेले होते. अशा वेळी डॉ. सुरज सर यांनी आजूबाजूंच्या काही लोकांना बोलून सभा घेण्यात आली आणि कोविड केअर सेंटर चालू करण्याचा निर्णय घेणात आला. प्रवीणभाऊ आडेपवार हास्कुल निफंद्रा येथे

कोविड सेंटर चालू करण्यात आला. आम्ही चालू केलेल्या कोविड सेंटर मध्ये २८ रुग्णांनी सेवेचा लाभ घेतला . लोकांना आमच्या कोविड सेंटर मध्ये सेवा घेताना सुरक्षित वाटत होते.

कामातील अडचणी: वार्षिक वेळापत्रक नसल्यामुळे कामाचा नियोजित स्वरूप नव्हता. आमच्यापैकी बऱ्याच जनांना बऱ्याच गोष्टी येत नसल्याने शिकायला वेळ लागत होता व लागतो त्यामुळे धावपळ होते . मात्र आता हळू हळू आम्ही सर्वांनी खूप सुधारणा केल्या.

प्रशिक्षण : जाणीव रुग्णालय व संस्थेकडून शहीद रुणालय दल्ली राजहरा छत्तीसगड येथे माझी प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून प्रशिक्षण झाल.

तिथे राहण्याची सोय : सरांचे काही मित्र डॉक्टर शहीद रुग्णालयामध्ये काम करत आहेत. माझी राहण्याची सोय व जेवण्याची सोय त्यांच्या कडे होती. डॉ.पराग राऊत सर आणि डॉ.श्रीनिधी दातार सर यांच्या कडून खूप काही शिकायला मिळाल. दोन्ही सर मला रुग्णासोबत कस बोलायचं,काय विचारच,काय विचारू नये,कोणत्या रुग्णाची कोणती तपासण्या करायची,काय करू नये, रुग्णाची आजारावरच्या निदान काय आहे, तपासण्या कशी केली जाते, आजारावर ओषधी उपचार कसे केले जातात, ह्या सर्वाचे तोंडओळख व प्राथमिक शिक्षण केले. दोन्ही सर मला लहान भावाप्रमाणे समजत होते.

प्रयोगशाळेत शिकलेल्या तपासण्या : Urine Analysis, Maleria microsopy, T. B.microsopy, T.L.C. and D.L.C. microsopy, Sickle cell microsopy, C.B.C., Widal slides method, Gram bacteria, fluid AFB, C.R.P. , Fluid TLC and DLC, fluid TB, Occult Blood test, fluid gram bacteria, Urine sugar, Blood Crossmactch test, R.A. factor, E.S.R. Etc...

शहीद रुग्णालयाचा अनुभव : शहीद रुग्णालय मजूर लोकांच्या माध्यमातून झालेला छत्तीसगड च्या सर्वात मोठा रुग्णालय आहे. हा रुग्णालय छत्तीसगड च्या बालोद जिल्यात दल्ली राजहरा गावामध्ये आहे,मजूर व आदीवासी लोकांना इलाजासाठी सोय सुविधा नसल्यामुळे खूप वर्षा पूर्वी मजूर लोकांनीच रुग्णालय स्थापन करण्यात आली. रुग्णालयात रुग्ण बरे होणार या आशेवर येतात आणि खूप कमी खर्चात बरे होहून परत जातात. मी तिथे प्रयोगशाळेत काम करत असताना रोज ४०० रुग्ण तपासणीसाठी येतात, तरी पण दीदी लोक रुग्णासोबत चिडचिड न करता रुग्णासोबत चांगल वागत होते. मला तिथे दीदी लोक भय्या लोक व डॉक्टर मंडली मार्गदर्शन व सल्ला देत होते. तिथे गावोगावी जाऊन सुद्धा काही डॉक्टर रोग निदान शिबीर घेतात. माझे मन तिथे रमल मला वापस महाराष्ट्र यायची सुद्धा इच्छा

नव्हती पण किती दिवस तिथे राहणार हा प्रश्न पडला. दि.१५ ऑगस्ट २०२१ ला सर मला न्यायला दल्लीराजहरा येथे न्यायला आले व १६ ऑगस्टला आम्ही महाराष्ट्रात परत आलो.

मलेरियाची साथ: शहीद रुग्णालयामध्ये असताना मलेरियाचे केसेस भरपूर प्रमाणात पाहायला मिळाले. आदिवासी खेडेभागात सरकार दुर्लक्ष करत आहे. अशा वेळी शहीद रुग्णालये खेडेभागात जाऊन उपचार देत आहेत. तरी पण मलेरियामुळे भरपूर प्रमाणात लोक मृत्युमुखी पडलेले दिसतात.

आणि यापुढील काम चालू आहे.

अजय रमेश भांडेकर

(प्रयोगशाळा तंत्रज्ञ जा.रु. गेवरा बुज.)

जाणीव रुग्णालय गेवरा बुज.

रुग्णालयाची स्थापना करायची ठरल्यानंतर त्यातील विविध विषयांची माहिती सर द्यायचे , आम्ही रुग्णालय पहिले होते तरी अशा पद्धतीने जसे सर म्हणत होते तशा पद्धतीने कार्य करणारे रुग्णालय आम्ही पहिले नव्हते . आमच्यातील बहुतेकाने प्राथमिक आरोग्य केंद्र , खाजगी रुग्णालय व जिल्हा रुग्णालय पहिले होते . त्यामुळी असे रुग्णालय व अशा रुग्णालयातील व्यवस्था याचा अनुभव नव्हता. सेवाभावी रुग्णालय कसे असते ते कसे चालते हे माहित नव्हते.

तेव्हा आम्ही सगळे सरांसोबत अभ्यास दौरा म्हणून शहीद रुग्णालय बघायला गेलो . शहीद रुग्णालय हे मजूर लोकां स्वतःच्या आरोग्याच्या गरजा लक्षात घेऊन स्वतःसाठी स्वतःच्या हाताने बांधलेले व स्व कष्टाने चालविलेले व आतापावतो चालत असलेले भारतातील फार जुने रुग्णालय आहे . शहीद रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ शैबाल जाणा व त्यांच्या पत्नी अल्पना जाणा तसेच इतर सिस्टर यांनी आम्हाला संपूर्ण रुग्णालयाची माहिती दिली .

आम्हाला रुग्णालय सुरु करायचे आहे हे एकूण त्यांना आनंद झाला . व पुढे येणाऱ्या अडचणींना कसे तोंड द्यायला तयार राहायचे व नेमाने काम करायचे याबद्दल सांगितले . आरोग्याचे काम करताना लागणारा धीर सांभाळून ठेवायला सांगितला . व पुढील कामासाठी शुभेचा दिल्या ,

आम्ही १ जानेवारी २०२१ ला रुग्णालयाची सुरुवात केली. मागील वर्षभर आम्ही दवाखाना चालवीत आहोत. उसरपार येथे साथ कोविड दरम्यान अचानक खूप तापाचे रुग्ण वाढू लागल्याने शिबिराचे आयोजन करण्यात आले. गावातील .... लोकांनी शिबिराचा लाभ घेतला . कोविड मध्ये सर्व तपांच्या रुग्णांना कोरण मध्ये घेऊन जातात या भीतीने लोक शासकीय व्यवस्थेचा लोक लाभ घेत नाहीत व गावातील बोगस डॉक्टरांच्या इलाजाने मृत्युमुखी पडतात हे ओळखून, मा.तहसीलदार यांच्या परवानगीने गावातील ग्रामपंचायतीमध्ये सायंकाळी शिबिराचे आयोजन केले होते . रात्री दहा वाजेपर्यंत ओपीडी सुरु होती . यावरून तेव्हा लोकांनी आम्ही उपचार करायला गेलो नसतो तर लोकांनी कुठे दाखवले असते हा प्रश्न पडून राहतो ?

त्याच पद्धतीने गावातील लोकांना आजारांची माहिती व्हावी व योग्य उपचार समजावे ह्या हेतूने काही गावांनी स्वताहून रोग निदान शिबिराचे आयोजन त्यांच्या स्तरावर केले त्यात सुद्धा आमच्या रुग्णालयाने व्याधींवर उपचार केला. अशा पद्धतीने विरखल, पालेबारसा, चिखली येथे रोग निदान शिबीर घेण्यात आले व आवश्यक रुग्णांना रुग्णालयात येऊन उपचार घेण्यास सांगितले .

१ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान जागतिक स्तनपान आठवड्याच्या निमित्याने रुग्णालयात क्यान्सर , स्तनाच्या गाठी व तोंडाच्या व दातांच्या तपासणीचे शिबीर टाटा ट्रस्ट च्या मदतीने आयोजित केले होते. ह्या तपासणीचा लाभ परिसरातील ९९ रुग्णांनी घेतला . आवश्यक रुग्णांना चंद्रपूर येथे संदर्भित करण्यात आले .

याशिवाय कोविड दरम्यान आमच्या रुग्नालयाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या सहकार्याने कोविड सेंटर चालविण्यात आले व परिसरातील रुग्णांना याचा लाभ घेता आला .

अशा पद्धतीने नियमित ओपीडी व्यतिरिक्त सेवा शिबिरांच्या माध्यमातून रुग्णालयाने रुग्ण सेवेचे काम केले व करत आहे.

रुग्नालयाची सुरुवात झाली त्याअगोदरपासून जेव्हा सरांची ओळख झाली तेव्हापासून विविध कामानिमित्याने सरांसोबत जाने येणे होते. रुग्णालयाचे काम सुरु झाले तेव्हाचे नियोजन व्यवस्थापन आणि इतर अशी विविध जवाबदारीची कामे मी पाहत आहो. यापूर्वी काम केलेले असले तरी मी तसेच आमच्यातील अनेक सहकारी आरोग्य सेवेत अशा पद्धतीचे काम करून नाही आहोत . तेव्हा काही काही गोष्टी सरांनी सांगितलेल्या लक्षात येत नाहीत. समजत नाहीत . तेव्हा कामात दिरंगाई होते. कधी कधी सर रागावतात व चुका होतात. मात्र तरीही सर्वाना सोबत असे काम करताना मजा येत आहे. चुकत शिकत जाऊ अशी सर्वाना आशा आहे. आम्ही चालू केलेलं हे रुग्णालय रोज येणाऱ्या नवीन अनुभवासोबत आम्ही सर्वे समोर नेऊ हा विश्वास आहे .

– श्री. गुरुदेव शेंडे

एका भाड्याच्या घरात सुरू केलेला कार्यालय, सुरुवातीला सर्वांना नवल वाटायचं, हे कशाच कार्यालय आहे? वास्तविक संस्थेची निर्मिती अचानक परिचय, भेटीगाठी, विचारांची देवाण घेवाण व समन्वयातून, परिसरातील वंचित, दलित व ईत्तर घटकांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने ११ व्यक्ति त्यात डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी यांनी एकत्र येऊन म्हणजेच सोबत फाऊंडेशन चंद्रपुर ची स्थापना दि. २९ नोव्हेंबर २०२० ला चंद्रपुर येथील म्हस्के वाड्यातील बैठकीत झाली, संस्था स्थापणेंनतर या परिसरातील लोंकाची गरज ओळखून प्रथम दवाखाना सुरू करण्यात यावा असे ठरविण्यात आले, त्या दवाखान्याला जाणीव रुग्णालय असे नाव देण्याचे ठरले, आणि संस्थेच्या माध्यमातून माफक दरात सेवा देणारे रुग्णालय १ जानेवारी २०२१ ला सुरू करण्याचे नियोजित झाले आणि कार्यान्वित झाले.

चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्याच्या शेवटच्या टोकावर व वैनगंगा नदीच्या पश्चिम काठावर घनदाट झुडपी जंगलाने व्यापलेला ह्या परिसरात, आदिवासी बहुल भागातील व्याहाड–गांगलवाडी सावली वनपरिक्षेत्रात १४०० लोकसंख्येचे गेवरा बूज. हे छोटेसे गाव आहे. गेवरा बूज. चे अंतर जिल्ह्याच्या ठिकाणापासून १०० किमी आहे. इतर सर्व दुय्यम देखभाल केंद्रे आणि तालुका ठिकाणे ब्रम्हपुरी, मूल आणि सिंदेवाही अनुक्रमे ५०,४० आणि ५० किमी अंतरावर आहेत. सर्वात कमी अंतरावर पोहोचण्यायोग्य जिल्हा रुग्णालय गडचिरोली येथे आहे, जे ४० कि.मी. अंतरावर आहे. इतर सेवा संस्थांच्या माध्यमातून उपलब्ध असलेली सेवा ख्रिस्तानंद रुग्णालय ब्रम्हपुरी व मां. दंतेश्वरी रुग्नलाय चातगाव येथे ५० व ७० किमी अंतरावर अनुक्रमे उपलब्ध आहे. उच्च दर्जाची अतिदक्षता सेवा व रुग्णालय व्यवस्था १७० किमी ते २०० किमी अंतरावर फक्त नागपूर आणि सेवाग्राम येथे उपलब्ध आहे.

या तालुक्याची आरोग्य व्यवस्था प्रामुख्याने सहा प्राथमिक उपचार केंद्र आणि सावली ग्रामीण रुग्णालयावर पूर्णपणे अवलंबून आहे. यासह फक्त एक एमबीबीएस फिजिशियन यांचा खाजगी दवाखाना आणि २ ते ३ बीएएमएस फिजिशियन यांचे खाजगी दवाखाने तालुक्याच्या ठिकाणी आहेत. सावली तालुक्याच्या ९४ गावांतील १ लाख लोकसंख्येसाठी ही संख्या फारच कमी आहे. उपलब्ध सेवा परिणामकारक आणि गुणात्मक नसल्यामुळे लोक मुख्यतः

बोगस डॉक्टरवर अवलंबून असतात. गेवरा बूज. च्या आसपासच्या परिसरात सावली तालुक्यातील ३५००० लोकसंख्येची जास्तीत जास्त ३० गावे आणि ब्रम्हपुरी तालुक्यातील सुमारे २०००० लोकसंख्या असलेली १५ गावे समाविष्ट आहेत.प्राथमिक आरोग्य केंद्रा ऐवजी कोणतीही खाजगी किंवा संघटित स्वरूपातील सेवा ह्या पारेसरात उपलब्ध नाही.या परिसरात कुष्ठरोग, हत्तीरोग, क्षयरोग, डेंग्यू, त्वचा रोग,अशक्तपणा, स्त्रीरोग आणि नव्याने दिसणाऱ्या एनसीडीचा म्हणजेच बिपी शुगर ह्या आजारांच्या मोठा भार दिसून येतो.

हंगामी धान पिकांऐवजी या परिसरात उत्पन्नाचे कोणतेही स्रोत उपलब्ध नसल्यामुळे वर वर्णन केलेल्या ५०००० लोकसंख्येतील २०००० पेक्षा जास्त लोक वर्षातील बहुतांश काळ कामासाठी तेलंगणा, पश्चिम महाराष्ट्र आणि वऱ्हाड येथे स्थलांतरित होतात. परिणामी मुले, वयोवृद्ध लोक व गरोदर माता घरात एकटे राहतात, त्यामुळे त्यांना विविध परिणामाचा सामना करावा लागतो.

या सर्व गोष्टींसह या परिसरातील काही स्थानिक नागरिकांशी चर्चा केल्यानंतर आम्ही क्लिनिक सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि १ जानेवारी २०२१ पासून बाह्यरुग्ण सेवा, मूलभूत आपत्कालीन सेवा आणि २ खाटांची आंतररुग्ण सेवा, ड्रेसिंग आणि कमी किमतीची जेनेरिक औषधे आणि विशेष सेवा शिबिरांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठी जाणीव रुग्णालयाची निर्मिती करण्यात आली.

यासोबतच सरकारी सेवा आणि इतर आरोग्य सुविधांपासून व जाणीव रुग्णालय गेवरा बूज. पासून दूर असलेल्या गावांमध्ये सामुदायिक उपचार केंद्र सुरू करण्याचा सोबतचा मानस आहे. यानिमित्याने समाज म्हणून आम्ही सगळे स्वतः स्वतःच्या भल्यासाठी व समाजातील दरी ओलांडण्यासाठी ही कृती सयुंक्तिकरित्या करीत आहोत.

- श्री. पुनम झाडे

धन्यवाद...!